**दिनांक १९.०१.२०२६ रोजी–**

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांचा फेर–उलटतपास निशाणी क्रमांक १८५ वरील दिनांक १९.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये शपथेवर सुरू – आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस, विधीज्ञ यांचे द्वारा–**

दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे कथीत पत्र हे श्री. सबनिस यांची आरोपी क्र.१ यास सांगीतले होते हे प्रथम मला जेंव्हा श्री. सबनीस यांनी जवाहरनगर पोलीस ठाण्यात प्रथम तक्रार दिली त्याचा दिनांक १४.१२.२०२४ त्या दिवशी मला समजले. हे म्हणने खरे आहे की, मला या पत्राबद्दल श्री. सबनीस यांची सांगीतले म्हणून मला समजले. ते कथीत दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे पत्र हे कोणी तयार केले हे मला माहीत नाही पण त्यावर श्री. सबनीस यांनी सही केली आहे. मला असा त्यावेळेला प्रश्न पडला नाही की, श्री. सबनीस यांनी हे दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे पत्र कोणाकडुन तयार करून घेतले. माझा सरतपास निशाणी क्र.५५ मधील परिच्छेद क्र.१४ मधील मी जे कथन केले आहे कथीत पत्र दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे आरोपी क्र.१ ने तयार केले व बँकेत नेऊन दिले असा जो काही चुकीचा मजकुर लिहलेला आहे हा मजकुर मला श्री. सबनिस यांनी मला सांगीतला.

हे म्हणने खरे आहे की, दिनांक २४.११.२०२५ रोजीचा माझा अतिरीक्त सरतपास मधील कथीत पत्र हे मला दाखविले व ते मी ओळखले असे जे मी सांगीतले यातील कोणतेही पत्र माझ्या समक्ष तयार झालेले नाही. पोलीसांनी जबाब द्यायच्या आगोदर मी ते पत्र पाहिले असे माझे कुठे कथन नाही, हे बरोबर आहे. हे म्हणने खरे नाही की, मला हे पुराव्यातील कथन करे पर्यंत दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे पत्र मला पाहण्याचा कधीही प्रसंग आलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, सदरचे पत्र हे माझ्या समोर तयार झालेले नाही त्यामुळे त्या पत्रा मध्ये कोणी काय लिहले अथवा सही केली अथवा हस्ताक्षरात काय लिहले याबद्दल मला वैयक्तीक काही माहीती नाही.

मला निशाणी क्र.१७४ चे पत्र आता दाखविले. या पत्रामध्ये असे कुठेही नमुद नाही की,"dsccch.sambhajinagar@gmail.com या ईमेला आयडीवर बँकेचे अकाउंट स्टेटमेंट पाठवा''. हे मला माहीत नाही की, हा कथीत ईमेल आयडी ह्यावर बँकेने कधीही कुठलाही कागदोपत्री व्यवहार केलेला नाही. हे म्हणने खरे आहे की, या ईमेलवर बँकेने काही पत्रव्यवहार केला आहे का? हे मी आजपर्यंत कधीही बघीतले नाही व त्यामुळेच मला त्या ईमेलवर काही पत्रव्यवहार झालेला असल्यास झालेल्या व्यवहाराचे कागदपत्रे पोलीसांना द्यायचा प्रसंग आला नाही व त्या ईमेल मध्ये काय हे मी आजपर्यंत कधीच बघीतलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, हा कथीत ईमेल कधीही आरोपी क्र.१ ने लिहला नाही अथवा बँकेने त्यावर कधीही

कोणतेही स्टेटमेंट पाठविलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, कथीत ईमेल हा आरोपी क्र.१ने कधीही लिहला नाही अथवा बँकेने कधीही स्टेटमेंट पाठविले नाही, हे मी खोटे आहे असे म्हणालो त्याबद्दल माझ्याकडे कोणताही आधार नाही. हे म्हणने खरे आहे की, माझे असे कुठेही म्हणने नाही की, बँकेने मला अथवा श्री. सबनीस यांना बँकेला ईमेल आयडी बदलावयाचे पत्र आरोपी क्र.१ ने दिले आहे व त्यावर नवीन ईमेल आयडीवर स्टेटमेंट पाठवा अशी कोणतीही तक्रार आम्हाला मिळालेली नाही.

हे म्हणने खरे आहे की, माझी फिर्याद <u>निशाणी क्र.६६</u>, माझा सरतपास <u>निशाणी क्र.५५</u> यामधील माझे असे कुठेही म्हणने नाही की, आरोपी क्र.१ हा कॅशबुक मेंन्टेन करायचा. हे म्हणने खरे आहे की, कॅशबुक मेंन्टेन करायाचे काम हे आरोपी क्र.१ च्या अख्त्यारीत होते असे माझे कुठेही म्हणने नाही. हे म्हणने खरे आहे की, जे काही कॅशबुक मेंन्टेन होत होते ते सर्व काम लेखा विभाग करीत. हे म्हणने खरे आहे की, कथीत कॅशबुक आणि जावक नोंदवही जे काही होते ते माझ्या ताब्यात नव्हते. हे म्हणने खरे नाही की, विभागीय क्रिडा संकुल समितीच्या कुठल्याही गोष्टी म्हणजे रेकॉर्ड, कागदपत्रे हे विभागीय उपसंचालक कार्यालय, छ.संभाजीनगर यांचेकडे कुठलेही कागद असण्याचा काही संबंध नाही. मी याबद्दल पोलीसांना लेखी पुरावा दिलेला नाही.

हे म्हणने खरे आहे की, आरोपी क्र.१ याचा नमुना हस्ताक्षर घेण्याची प्रक्रिया ही माझ्या समक्ष झालेली नाही. मला आता <u>निशाणी क्र. १७४</u>– दिनांक ३०.०८.२०२४ रोजीचे कथीत पत्र दाखविले. हे म्हणने खरे आहे की, या पत्रावर आरोपी नाव, सही, अंगठा असे काहीही लिहलेले नाही. बँक अकाउंट स्टेटमेंट, इंटरेस्ट सर्टीफिकेट स्टेटमेंट हया दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत, हे मला सांगता येत नाही. इंटरेस्ट सर्टीफिकेट व अकाउंट स्टेटमेंट व इंटरेस्ट अकाउंट हे वेगवेगळ्या गोष्टी आहेत, हे असु शकते. हे म्हणने खरे आहे की, ह्या दोन्ही गोष्टी बँकेला मागितल्यानंतरच बँक देते. मला निशाणी क्र.१७४ पत्र आता दाखविले. हे म्हणने खरे आहे की, <u>निशाणी क्र.१७४</u> नुसार दिनांक ०१.०४.२०१९ ते ३१.०७.२०२३ रोजी केवळ खात्यास व्याज किती मिळाले याबाबतचे स्टेटमेंट मिळावे असे या पत्रात नमुद आहे. हे म्हणने खरे आहे की, <u>निशाणी क्र.१७४</u> पत्राने श्री. सबनीस यांनी दिनांक ०१.०४.२०१९ ते ३१.०७.२०२३ पर्यंत व्याज किती जमा झाले याचेच स्टेटमेंट बँकेकडे मागविले. हे म्हणने खरे आहे की, दिनांक ०१.०४.२०१९ ते दिनांक ३१.०७.२०२३ पर्यंतचे इंटरेस्ट स्टेटमेंट पोलीसांनाही दिलेले नाही अथवा या खटल्याकामी हजरही केलेले नाही. हे मी सांगु शकत नाही की, आज पर्यंत बँकेने कधीही अकाउंट स्टेटमेंट हे विभागीय क्रिडा संकुल समितीला कधीही असे स्टेटमेंट दिलेले नाही कारण तसे कधी मागितलेलेच नाही. हे म्हणने खरे नाही की, बँक स्टेटमेंट अथवा इंटरेस्ट स्टेटमेंट मी कधीच पाहिले नाही व यामधील मला काहीही माहीती नाही त्यामुळे फक्त श्री. संजय सबनीस यांनी मला जे काही सांगीतले तेच मी फिर्याद अथवा सरतपासात सांगीतले. हे म्हणने

खरे आहे की, दिनांक २२.१२.२०२४ रोजीचा जप्ती पंचनामा हा आरोपीच्या समक्ष झालेलाच नाही.

हे म्हणने खरे आहे की, कॅशबुक हे माझ्याकडे कधीही वैयक्तीक ताब्यात नसल्यामुळे ते पोलीसांनी माझ्याकडुन वैयक्तीक ताब्यातून घेतलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, हे कॅशबुक माझ्या वैयक्तीक कधीही ताब्यात नसल्यामुळे त्यामध्ये कोणी काय मजकुर लिहला आहे याबद्दल मला माहीती असण्याचा काही संबंध नाही. हे म्हणने खरे आहे की, माझे असे कुठेही म्हणने नाही की, निशाणी क्र.१७५–कॅशबुक हे माझ्या समक्ष प्रत्येक वेळी लिहले गेले आहे. हे म्हणने खरे नाही की, माझ्या सरतपासात मी सांगीतले की, कॅशबुक–निशाणी क्र.१७५ हे माझ्या ताब्यातुन जप्त केले, हे मी खोटे सांगत आहे. कॅशबुक मधील माहीती संबंधात मी माझा सरतपास व फिर्याद मध्ये जे काही मी सांगीतले ते सर्व मी श्री. संजय सबनीस यांनी सांगीतल्याप्रमाणे मी सांगीतले.

हे म्हणने खरे आहे की, ईमेल आयडी अथवा बँकत काहीही बदल करावयाचा असल्यास त्या बद्दलचे पत्र हे श्री. संजय सबनीस यांच्या सहीने पत्र द्यावे लागते. हे मला सांगता येणार नाही की, तसे पत्र देण्यासाठी श्री. संजय सबनीस यांना अध्यक्ष, क्रिडा संकूल समितीची लेखी परवानगी घ्यावी लागते. मी स्वतः श्री. संजय सबनीस यांनी सही बदल करण्यासाठी बँकेला पत्र दिले आहे काय? हे मला सांगता येणार नाही व तसेही पत्र मी पाहिलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, काहीही न बघता व काहीही माहीती न घेता माहीती अभावी मी निशाणी क्र.६६ फिर्याद पोलीसांना दिली व त्यामध्ये पत्र दिनांक ३०.०८.२०२४ चे कथन केले.

माझ्या सरतपासमधील परिच्छेद क्र.९६ मधील मजकुर की, ''सदर कॅशबुक मधील नोंदी ह्या आरोपी क्र.१ च्या हस्ताक्षरात घेतल्या जात होत्या '' हे मी प्रथम मा. न्यायालयात प्रथम सांगीतले. हे मला सांगायला कोणीही सांगीतले नाही, माझे मीच सांगीतले. माझे असेच म्हणने आहे की, हस्ताक्षर तज्ञांना काय नमुने दिले याबद्दल मला काही माहिती नाही.

हे म्हणने खरे नाही की, बँक मॅनेजर श्री. सुशील कुमार सैनी आणि श्री. संजय सबनीस यांचेशी मी संगणमत करून खोटी फिर्याद दिलेली आहे. मी स्वतः वैयक्तीक फिर्यादी या नात्याने निशाणी क्र.१७४ मध्ये जे काही कथीत ईमेल आयडी कोणाचा आहे तो मी कधीही स्वतः तपासून पाहिलेला नाही व त्या ईमेल आयडीबद्दल मला काहीही माहिती नाही. हे म्हणने खरे नाही की, पत्र निशाणी क्र.१७४ वर आरोपी क्र.१ याने काहीही मजकुर लिहलेला नाही. हे म्हणने खरे नाही की, पत्र निशाणी क्र.१७४ वर नमुद ईमेल आयडी हा आरोपीचा नव्हता व नाही. हे म्हणने खरे नाही की, सन–२०२० पर्यंतचे झालेले ऑडीट झालेले असल्याचे मला माहीत असतांना त्यासाठी अकाउंट स्टेटमेंट वगैरे मागविणे हे सर्व बनावटगिरी आहे.

हे म्हणने खरे नाही की, बँकेने कधीही कुठलाही पत्रव्यवहार कार्यालयाशी ईमेलवर

**निशाणी क्र. ५५/ क लगत**

कार्यालयाशी केलेला नाही मी तसा काही पत्रव्यवहार हजर केलेला नाही अथवा पोलीसांनाही दिलेला नाही. मी या प्रकरणाशी संबंधीत बँकेचे सर्व कागदपत्र हे मी स्वतः पाहिलेले नाहीत.हे म्हणने खरे नाही की, मी काही कादगपत्रे पाहिलेले नाहीत व त्याबद्दल मला काहीही माहिती नाही असे असतांना श्री. संजय सबनीस यांनी दिलेल्या ऐकीव माहीतीच्या आधारे बँकेच्या स्टेटमेंटबद्दल सांगत आहे. मी, बँकेची कागदपत्रे सर्व पाहिलेली नाहीत हे खरे असून ऐकीव माहीतीच्या आधारे सांगत आहे हे खोटे आहे. हे म्हणने खरे नाही की, बँक मॅनेजर श्री. सुशीलकुमार सैनी, श्री. संजय सबनीस व मी असे आम्ही तिघांनी कट कारस्थान करून खोटी फिर्याद तयार करून आरोपी क्र.१ यास अडकविलेले आहे. हे म्हणने खरे नाही की, निशाणी क्र.१७४ या पत्राशी आरोपीचा काहीही संबंध नाही. हे म्हणने खरे नाही की, निशाणी क्र.१७४ पत्रावर आरोपीचे काही हस्ताक्षर नाही अथवा त्याचे हस्ताक्षरही नाही.

**आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास संपला, उर्वरीत सर्व आरोपींनी यापुर्वीच झालेल्या सरतपासावर उलटतपास घेणार नाही असे कळविलेले. त्यामुळे उलटतपास आरोपीं तर्फे संपला.**
**फेर सरतपास– नाही.**

समक्ष
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– १९/०१/२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती.
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद